**ठळक बातम्या**

- लाडकी बहीण योजना थांबणार नसल्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही
- संरक्षण उत्पादनांच्या निर्मितीसाठी निबे कंपनी रत्नागिरी जिल्ह्यात एक हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार
- कोलकाता इथं महिला डॉक्टरवर झालेला बलात्कार आणि हत्येच्या घटनेची सर्वोच्च न्यायालयाकडून स्वतःहून दखल / मंगळवारी सुनावणी

**आणि**

- राज्य शासनाचा मराठी चित्रपट पुरस्कार सोहळा येत्या बुधवारी /आशा पारेख, एन. चंद्रा, शिवाजी साटम यांच्यासह नामवंतांचा होणार गौरव

**<><><><><>**

लाडकी बहीण योजना थांबणार नसल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची दिली आहे. ते आज सातारा इथं महिला सशक्तीकरण अभियानात बोलत होते. राज्यातल्या बहिणींना उद्योगशील बनवून लखपती करायचं आहे. तुम्ही जितक्या ताकदीनं सरकारच्या पाठीशी उभे राहाल, तेवढ्या ताकदीने सरकार तुम्हाला मदत करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिली. साताऱ्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांच्या सन्मान सोहळ्यात ते बोलत होते.

जनतेनं काम करत राहण्यासाठी आपल्याला आशीर्वाद देऊन आपल्या सरकारची ताकद वाढवावी, असं आवाहन त्यांनी केलं. या योजनेसाठी ३५ हजार कोटी रुपयांची तरतूद केली असल्याचं त्यांनी नमूद केलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विचारांचं अनुकरण करत राज्यात महिला केंद्रित योजना सुरू केल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. इतक्या बहिणींचे आशीर्वाद मुख्यमंत्री शिंदे यांच्यामागे कवचकुंडलं बनून उभे आहेत, असं प्रतिपादन त्यांनी केलं.

या योजनेत अधिकाधिक महिलांनी सहभागी व्हावं, असं आवाहन महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केलं.

**<><><><><>**

संरक्षण क्षेत्रात काम करणारी निबे लिमिटेड ही कंपनी या क्षेत्रातल्या वस्तूंच्या निर्मितीसाठी रत्नागिरी जिल्ह्यात एक हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. यातून सुमारे एक ते दीड हजार रोजगार तयार होणार आहेत. यासंबंधीचा सामंजस्य करार आज राज्याचा उद्योग विभाग आणि निबे लिमिटेड कंपनी यांच्यात झाला. उद्योगमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यावेळी उपस्थित होते. संरक्षणविषयक उत्पादनं, शस्त्रास्त्रं यांचं प्रदर्शन, तसंच संरक्षण क्षेत्रातल्या रोजगाराच्या संधींची माहिती देणाऱ्या व्याख्यानांचं आयोजनही यावेळी केलं होतं.

**<><><><><>**

नाशिक शहरात दोन दिवसांपूर्वी झालेल्या दंगलीच्या पार्श्वभूमीवर अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दोन्ही बाजूंना शांततेचं आवाहन केलं आहे. ते आज नाशिकमधे वार्ताहर परिषदेत बोलत होते. दंगलीचं शहर अशी नाशिकची ओळख होऊ नये, त्याचा विकासावर मोठा परीणाम होईल, असं ते म्हणाले. पोलीस यंत्रणेनं वेळेत परिस्थिती आटोक्यात आणल्याबद्दल त्यांनी कौतुक केलं.

**<><><><><>**

ओबीसींना आपल्या हक्काच्या आरक्षणासाठी लढावं लागेल, असा इशारा मागासवर्गीय आयोगाचे माजी सदस्य प्रा. लक्ष्मण हाके यांनी दिला आहे ते आज

नांदेड जिल्ह्यात भोकर इथं ओबीसी आरक्षण बचाव मेळाव्यात बोलत होते. मंडल आयोगाच्या माध्यमातून १९९४ ला ओबीसींना मिळालेलं आरक्षण २००४ मध्ये संपवण्यात आलं आहे. बांठिया आयोगाच्या अहवालानंतर ओबीसींच्या ५६ हजार जागा कमी झाल्या आहेत. या आयोगानं राज्यात ओबीसींची संख्या कमी झाल्याचा अहवाल दिला आहे. तो अहवाल कोणत्या आधारे दिला याचा शोध घेणं गरजेचे आहे, असं ते म्हणाले. मराठा समाजानं राज्यात सुरू केलेली आरक्षणाची लढाई ही वर्चस्व वादाची असल्याची टीका त्यांनी केली.

मेळाव्यापूर्वी  उमरी चौकातून पारंपरिक वेशात भव्य रॅली काढण्यात आली.

**<><><><><>**

नागरिकत्व सुधारणा कायद्यात नागरिकत्व काढून घेण्याची नाही, तर नागरिकत्व देण्याची तरतूद आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज अहमदाबाद इथं आयोजित कार्यक्रमात १८८ हिंदू निर्वासितांना या कायद्यांतर्गत नागरिकत्व प्रमाणपत्रांचं वाटप केलं. त्यावेळी ते बोलत होते.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. भाऊ आणि बहिणींच्या अनोख्या नात्याचा हा सण असून यामुळे प्रेम आणि विश्वासाचं नातं बळकट होतं, असं त्यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. धार्मिक आणि सांस्कृतिक सीमा ओलांडून विविधतेत एकतेचं दर्शन घडवणारा हा सण असून महिलांच्या अधिकारांचं रक्षण करण्याच्या आपल्या प्रतिबद्धतेला बळकटी देणारा हा सण असल्याचं राष्ट्रपतींनी नमूद केलं आहे.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या विजयदुर्ग किल्ल्यात सायबाचे ओटे इथं आज हेलियम दिन साजरा करण्यात आला. सिंधुरत्न कार्यकारी समिती आणि विजयदुर्ग

ग्रामपंचायतीने या कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. ब्रिटिश खगोल शास्त्रज्ञ सर नॉर्मन लॉकियर यांनी १८ ऑगस्ट १८६८ रोजी विजयदुर्ग किल्ल्यावर हेलियम वायूचा शोध लावला होता. त्या घटनेचं स्मरण म्हणून गेल्या सोळा वर्षांपासून हेलियम दिवस साजरा केला जातो. आज झालेल्या कार्यक्रमात परिसरातले ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हेलियम वायूनं भरलेले फुगे आकाशात सोडून जय जवान, जय किसान, जय विज्ञान अशा घोषणा विद्यार्थ्यांनी यावेळी दिल्या.

**<><><><><>**

कोलकाता इथल्या वैद्यकीय महाविद्यालयात प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरवर झालेला बलात्कार आणि हत्येच्या घटनेची सर्वोच्च न्यायालयानं स्वतःहून दखल घेतली आहे. याप्रकरणी मंगळवारी सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर सुनावणी होणार आहे.

कोलकाता इथल्या राधा गोविंद कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात ९ ऑगस्टला प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरवर बलात्कार करून तिची निर्घृण हत्या झाली. या घटनेनंतर दुसऱ्या दिवशी  पोलिसांनी संशयित आरोपी संजय रॉय याला अटक केली. या घटनेनंतर देशात संतापाची लाट उसळली असून ठिकठिकाणी निदर्शनं केली जात आहेत. या घटनेतल्या आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे. या प्रकरणाचा तपास सीबीआयनं करावा, असे आदेश कोलकाता उच्च न्यायालयानं दिले आहेत.

**<><><><><>**

राज्य शासनाचा मराठी चित्रपट पुरस्कार सोहळा यंदा मुंबईत वरळीच्या डोम एसव्हीपी स्टेडियममध्ये येत्या बुधवारी संध्याकाळी ६ वाजता आयोजित केला

आहे. यावेळी ५८ व्या आणि ५९ व्या राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांचं वितरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते केलं जाणार आहे.

त्याचबरोबर २०२३ चा चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार जेष्ठ अभिनेते शिवाजी साटम यांना, तर  राज कपूर जीवनगौरव पुरस्कार जेष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांना या पुरस्कार सोहोळ्यात प्रदान केला जाईल. १० लाख रुपये, मानपत्र आणि मानचिन्ह, असं या पुरस्कारांचं स्वरुप आहे. यासोबतच, २०२३ चा चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार लेखक-दिग्दर्शक, अभिनेते दिग्पाल लांजेकर यांना, तर  राज कपूर विशेष योगदान पुरस्कार जेष्ठ दिग्दर्शक एन.चंद्रा यांना प्रदान केला जाणार आहे. ६ लाख रुपये, मानपत्र आणि मानचिन्ह असं या पुरस्कारांचं स्वरुप आहे.

गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार २०२४ प्रख्यात गायिका अनुराधा पौडवाल यांना प्रदान केला जाईल. चित्रपटांसाठी ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी यांना, तर गायनासाठी सुदेश भोसले यांना राज्य सांस्कृतिक पुरस्कार २०२४ नं सन्मानित केलं जाईल.

**<><><><><>**

मराठी विज्ञान परिषदेतर्फे विज्ञान आणि तंत्रज्ञानक्षेत्रातल्या योगदानासाठी दिले जाणारे ‘मविप जीवन गौरव पुरस्कार’ जाहीर झाले आहेत. यावर्षी डॉ. रघुनाथ माशेलकर पुरस्काराकरता प्रा. रोहिणी गोडबोले आणि डॉ. अजय सूद यांची, तर डॉ. कमला सोहोनी पुरस्काराकरता डॉ. माधव गाडगीळ, आणि डॉ. महताब बामजी यांची निवड झाली आहे. मराठी विज्ञान परिषदेच्या ५९ व्या वार्षिक अधिवेशनात १६ नोव्हेंबरला हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**<><><><><>**

केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांचा आज शहादा तालुक्यात नागरी सत्कार करण्यात आला. शहादा तालुक्यात खेड इथं रक्षा खडसे यांचं माहेर आहे. त्यामुळे माहेरच्या लोकांनी केलेलं कौतुक हे नक्कीच सुखावणारं आहे, अशा भावना खडसे यांनी व्यक्त केल्या. यावेळी रक्षा खडसे यांच्या आई-वडिलांचाही सत्कार झाला.

दरम्यान, तालुक्यातल्या पिंगाणे ग्रामपंचायतीत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करावी यासाठी आमरण उपोषणाला बसलेल्या आंदोलकांची रक्षा खडसे यांनी रॅली सुरू असताना भेट घेतली. शहादा इथल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ हे आंदोलन सुरू आहे.

**<><><><><>**

श्रावणी सोमवारच्या निमित्तानं नाशिक जिल्ह्यात त्र्यंबकेश्वरमध्ये होणारी पर्यटकांची गर्दी लक्षात घेत एसटी महामंडळानं २७० जादा बसगाड्यांचं नियोजन केलं आहे. नाशिकच्या ठक्कर बाजार स्थानकातून १९०, आंबोली स्थानकातून १०, घोटी स्थानकातून १०, खंबाळे स्थानकातून ५०, पहिने स्थानकातून १० जादा गाड्या सोडण्यात आल्या. या गाड्यांमधून आज दिवसभरात एक लाखापेक्षा जास्त भाविकांनी त्र्यंबकेश्वरला जाण्यासाठी प्रवास केला. उद्या रात्री ९ वाजेपर्यंत शहरात येणारी खासगी वाहनं खंबाळे, आंबोल, तळवाडे इथं थांबवली जातील.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी जोरदार पाऊस पडला. येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी, तर कोकण, मराठवाडा आणि विदर्भात अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**